# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५०१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:-१३/०८/२०१६.

**१) ऑईलची चोरी . :-**

दिनांक १०/०८/२०१६ ते ११/०८/२०१६ रोजी २२.०० ते ०६.०० वा. दर. यातील कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण म. रा. वि. वि. कं. मोहाडी येथील ट्रान्सफार्मर मधील ऑईल १६० लीटर कि. १७,६००/-रु. चा हरदोली येथुन चोरुन नेल्याने फिर्यादी विनोद मनोहर मस्के वय ३३ वर्ष, रा. मोहाडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. निरगुडे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**२) टाटा सुमो गाडीची ट्रॅक्टरला धडक लागल्याने महीलेचा मृत्यु ,एक गंभिर जखमी . :-**

दिनांक १२/०८/२०१६ रोजी ११.०० वा. दर. यातील फिर्यादी चक्रधर चैतुली पाटनकर वय ३० वर्ष, रा. भावड यांची भावजय मृतक सौ. रत्नप्रभा विनोद पाटनकर वय ३० वर्ष, ही गावच्या ट्रॅक्टरवर बसुन कोंढा येथे जात असता समोरुन कोंढा कडुन येणा-या यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन ट्रॅक्टरला धडक मारल्याने मृतक ही ट्रॅक्टर वरुन खाली पडली व तीच्या डोक्यावरुन टाटा ४०७ पिकअप गाडीचा चाक गेल्याने मृतक ही जागीच मरण पावली व सोबत बसलेली महीला सौ. बिन्दु विठ्ठलराव उमाटे वय ५० वर्ष, रा. बोरगाव हीला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,३३७,३०४(अ)भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. नेवारे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) अवैध देशी दारू अडयांवर धाडी. :-**

दिनांक १३/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. वरठी, सिहोरा व पवनी येथील परीसरातील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १५ लिटर हातभट्टी दारू+सडवा+साहीत्य कि. १८,६००/-रु. चा तसेच ७२० मिली देशी दारु कि. २०० /-रु. माल एकुण कि. १९,०००/-रु. चा माल जप्त करण्यात आला.

(श्री.एस. टी. घुसर )
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५६११११

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.